



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २६५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०७ मे २०२५

## थोडक्यात

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना मुख्यमंत्र्यांसह मंत्रिपरिषद सदस्यांचे अभिवादन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील चौंडी येथे होणाऱ्या मंत्रिपरिषद बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळ चौंडीत दाखल झाले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मंत्रिमंडळ सदस्यांसह पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक परिसराला भेट देऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, होळकर घराण्याचे १६ वे वंशज युवराज यशवंतराव होळकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब डांगे आदींसह मंत्रिमंडळ सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक आणि त्याच परिसरात असलेल्या महादेव मंदिरात जाऊन दर्शन घेतले.

स्मारक परिसरात सुरू असलेले गढीचे नूतनीकरण, नक्षत्र उद्यान, संरक्षक भिंत, शिल्प, संग्रहालय, शिवसृष्टी या प्रगतीपथावरील कामांची पाहणी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे निवास, स्वयंपाकघर, देवघर, ओसरी, तुळशी वृंदावन, बैठकीचे ठिकाण, धान्य साठविण्याचे ठिकाण, दरबार या स्थळांची पाहणीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. सभापती प्रा. शिंदे यांनी याबाबतची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली.

### अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळासाठी ६८१ कोटी अहिल्यानगरसाठी मेडिकल कॉलेज : मुख्यमंत्री फडणवीस



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या जन्मगाव चौंडी येथे आज राज्य मंत्रिमंडळाची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली. चौंडी गावासाठी ६८२ कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला. तसेच अष्टविनायक गणपती मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी १४७ कोटी, श्री तुळजापूर भवानी मंदिरासाठी ८६५ कोटी, ज्योतिबा मंदिरासाठी २५९ कोटी, त्र्यंबकेश्वरसाठी २७५ कोटी, श्री महालक्ष्मी मंदिरासाठी १४४५ कोटी, आणि माहूर गड विकासासाठी ८२९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. एकूण ५५०३ कोटी रुपयांचे प्रकल्प मान्य करण्यात आले आहेत.

धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी 'यशवंत विद्यार्थी योजना' सुरू होणार असून १० हजार विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमात शिक्षण मिळणार आहे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृहांची उभारणी केली जाणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी अहिल्यानगरमध्ये वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणाही यावेळी केली.

### वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकाम साहित्याची चोरी ; आरोपींना अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** चंद्रपूर येथील नव निर्मित मेडिकल कॉलेज परिसरात सुरू असलेल्या बांधकामाचे ऑक्सीजन आउटलेट कापर पाईप चोरी करणाऱ्या चार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून त्यांच्या जवळून १ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई सोमवार ५ मे रोजी करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरात अवैध धंद्यांवर कारवाई तसेच घरफोड्या, चोरीच्या गुन्ह्यातील अज्ञात आरोपींचा शोध घेण्याकरीता गस्तीवर होते. यावेळी सराईत आरोपी गोलू उर्फ सुमोहित मेश्राम (२७, रा. अष्टभूजा वार्ड, चंद्रपूर) याने आपल्या साथीदारांसह नवीन वैद्यकीय महाविद्यालयात सुरु असलेल्या बांधकामातील ऑक्सिजन आउटलेट कापर पाईपची चोरी करुन ते आपल्या घरामागे ठेवल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी आरोपी व त्यांचे इतर साथीदार राहुल रतन रॉय (१९, रा. आझाद चौक, शामनगर, चंद्रपूर), सुंदरम संजय तिवारी (२१, रा. बायपास रोड, अष्टभूजा वार्ड, चंद्रपूर), कमलेश दादूभाई गुप्ता (२९, रा. अष्टभूजा वार्ड, चंद्रपूर) या आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींकडून ऑक्सिजन आउटलेट कारक पाईप व गुन्ह्यांत वापरलेली दुचाकी असा एकूण १ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींविरुध्द रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन अटक केली.

## पाकिस्तान झाला कंगाल ! भारताने केले हात वर...

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०६, इस्लामाबाद :**



जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला दोन आठवडे झाले आहेत. या हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा जीव गेला. दहशतवादी हल्ल्याचे धागेदारे पाकिस्तानपर्यंत गेल्यानं भारतानं शेजारी देशाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. सर्व आघाड्यांवर पाकिस्तानची कोंडी करण्यासाठी भारतानं निर्णयांचा धडाका लावला आहे. पाकिस्तानकडून सातत्यानं नियंत्रण रेषेवर गोळीबार सुरु आहे.

भारत आणि पाकिस्तानचे संबंध ताणले गेल्यानं दोन्ही देशांनी परस्परांच्या एअर लाईन्ससाठी आपापली हवाई क्षेत्रं बंद केली आहेत. आता याचा परिणाम जगभरातील अन्य एअर लाईन्सवरही झाला आहे. अनेक प्रमुख विमान कंपन्यांनी पाकिस्तानच्या हवाई हद्दीतून उड्डाण टाळलं आहे. बड्या कंपन्या पाकिस्तानी हवाई हद्दीचा वापर जाणीवपूर्वक टाळत आहेत. त्यामुळे पाकिस्तानला दर महिन्याला लाखो डॉलरचा झटका बसणार आहे.

सीएनएनच्या वृत्तानुसार, भारत आणि पाकिस्तानमधील तणावामुळे एअर फ्रान्सनं त्यांच्या विमानांना पाकिस्तानी हवाई हद्दीचा वापर न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. एअर फ्रान्स ही फ्रान्स सरकारची कंपनी आहे. यामुळे काही मार्गांवर विमानांना अंतर कापण्यासाठी अधिकचा वेळ लागत आहे. जर्मनीच्या लुफ्तान्सा कंपनीनंदेखील पुढील सूचना मिळेपर्यंत पाकिस्तानी हवाई हद्दीचा वापर बंद केला आहे. दक्षिण आशियातील तणाव निवळेपर्यंत बड्या कंपन्यांनी पाकिस्तानी हवाई हद्दीचा वापर न करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

पाकिस्ताननं भारतीय कंपन्यांना धडा शिकवण्याच्या उद्देशानं त्यांना आपल्या हवाई हद्दीत बंदी घातली. त्यामुळे पाश्चिमात्य देशांकडे जाणाऱ्या भारतीय विमानांना वळसा पडू लागला. पाकिस्ताननं अन्य देशांच्या विमान कंपन्यांना आपल्या हद्दीत बंदी घातलेली नाही. त्यांच्यावर कोणतेही निर्बंध लादण्यात आलेले नाहीत. मात्र तरीही बड्या विमान कंपन्यांनी पाकिस्तानी हवाई हद्दीचा वापर थांबवला आहे. त्यामुळे प्रवासासाठी लागणारा वेळ वाढला आहे. इंधनावरील खर्च, कर्मचाऱ्यांवरील खर्च यात वाढ झालेली आहे.

ब्रिटिश एअरवेज, स्विज इंटरनॅशनल एअर लाईन्स, एमिरेट्सची काही विमानंदेखील पाकिस्तानी हवाई हद्दीचा वापर टाळत आहेत. त्यामुळे पाकिस्तानचा महसूल बुडणार आहे. या सगळ्या कंपन्या हवाई हद्दीच्या वापराच्या बदल्यात पाकिस्तानला ओव्हरफ्लाईट चार्ज देत होत्या. आता हे शुल्क पाकिस्तानला मिळणार नाही. त्यामुळे पाकिस्तानला आर्थिक तोटा सहन करावा लागेल.

## मल्लखांबमध्ये महाराष्ट्राला सलग सातव्यांदा पदक, सांघिक गटात रौप्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, गया :** मुलांच्या मल्लखांब सांघिक गटात सर्वच संघांनी एकाचढ एक रचना सादर करून ७ व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत उपस्थित प्रेक्षकांना अचंबित केले. अतिशय चूरशीच्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने रौप्यपदक खेचून आणले.

या स्पर्धेत मल्लाखांबमध्ये महाराष्ट्राला सांघिक गटात सलग सातव्या वर्षी पदक जिंकण्याचा करिश्मा घडविला आहे. याचबरोबर मुलींच्या गटातही मराठमोळ्या खेळाडूंनी जोरदार कामगिरीच्या जोरावर पदकाच्या दिशेने दमदार पाऊल टाकले आहे.

गया शहरातील आयआयएम संस्थेच्या सभागृहात सुरू असलेल्या सांघिक मल्लखांब प्रकारात महाराष्ट्राने केवळ पाईंट ४५ गुणांनी छत्तिसगड संघाला मागे टाकत १२२.५० गुणांची कामगिरी करीत रूपेरी यश मिळविले. आयुष काळंगे, निशांत लोखंडे, ओम गाढवे, निरंजन अमृते, आर्यन आबोडकर व प्रज्ञेश तावडे यांच्या संघाने सांघिक मल्लखांबच्या तिन्ही प्रकारात चमकदार खेळाचे प्रदर्शन घडवत महाराष्ट्राला



हे रौप्यपदक जिंकून दिले. मध्यप्रदेश संघाने १२३.६० गुणांची कमाई करीत सुवर्णपदक, तर छत्तिसगड संघाने १२२.०५ गुण संपादून कांस्यपदक कमवले.

मुलींच्या सांघिक गटातही लक्षवेधी कामगिरी करीत महाराष्ट्राने पदकाकडे वाटचाल सुरू केली अहे. तनश्री जाधव, आर्या साळुंके, सई शिंदे, तन्वी दवणे, हदया दळवी व हिरण्या कदमने दोरीवरच्या मल्लखांबात आकर्षक आणि थरारक प्रात्यक्षिके सादर करीत आघाडी कायम राखली आहे.

## राजुरा क्षेत्रातील टंचाईग्रस्त गावांना ५३ हातपंप मंजूर ; आ.भोंगळे यांच्या प्रयत्नांना यश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, (राजुरा) चंद्रपूर :** वाढत्या उष्णतेमुळे राज्यातील अनेक भागांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. याच पार्श्वभूमीवर आ. देवराव भोंगळे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे राजुरा मतदारसंघातील टंचाईग्रस्त गावांमध्ये ५३ नवीन हातपंप (विंधन विहीर) बसवण्यास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. यामुळे उन्हाळ्यात पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या गोरगरीब नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

उन्हाळा लागला की, अनेक गावांना पाणी टंचाईची झळ सोसावी लागते. राजुरा विधानसभेतील अनेक गावांमध्ये पाण्याची पातळी खालावत चालल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याचा धोका होता. अनेक ठिकाणी हातपंप नादुरुस्त होते किंवा पाण्याची पातळी खाली गेल्याने बंद पडले होते.

नागरिकांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची नामुष्की येऊ नये म्हणून या समस्येची गांभीर्याने दखल घेत आ. देवराव भोंगळे यांनी फेब्रुवारी महिन्यातच विधानसभेतील प्रत्येक तालुक्यात आढावा बैठका घेऊन संबंधित यंत्रणेनी टंचाईग्रस्त गावांची पाहणी करुन तेथील गरजेनुसार नवीन हातपंपासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा अशा अधिकाऱ्यांना सूचना दिल्या



होत्या. त्यानंतर स्वत: पत्रव्यवहार व पाठपुरावाही केला. त्यांच्या याच प्रश्नांना यश आले असून राजुरा विधानसभेतील राजुरा तालुक्यात २० कोरपना तालुक्यात ०९ तर गोंडपिपरी तालुक्यात २४ अशा एकूण ५३ हातपंपाच्या मंजुरीचे आदेश प्राप्त झाले आहेत. तसेच येत्या काही दिवसात जिवती तालुक्यातही टंचाईग्रस्त गावांना नवीन हातपंप मंजूर होणार आहेत. आ. देवराव भोंगळे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे ५३ गावांना मिळालेले हे हातपंप पाणीटंचाईवर मात करण्यासाठी महत्वाचे ठरणार आहे. लोकप्रतिनिधीनी जनतेच्या समस्यांसाठी सक्रिय राहुन पाठपुरावा केल्यास प्रश्न मार्गी लागू शकतात यांचे हे उत्तम उदाहरण आहे. त्यासाठी नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

## बोहल्यावर चढण्यापूर्वीच काळाची घाला ; ट्रकची जोरदार धडक, तरुणाचा मृत्यू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, बुलडाणा :** सध्या उन्हाचा प्रचंड प्रकोप सुरू असून त्यामध्ये या आठवड्यात मोठ्या प्रमाणात लगीन सराईची धूम सुरू आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे रस्त्यावर वाहनांची प्रचंड वर्दळ होत आहे. अशाच धामधुमीच्या काळात विटांनी भरलेला ट्रकची आणि मोटरसायकलची जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात एका तरुणाचा दुर्दैवी अंत झाला आहे.

ही घटना इतकी भीषण होती की, यामध्ये मोटरसायकल वरील युवकाच्या मेंदूचा चेंदामेंदा झाला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. तर, या अपघातात त्याचे ४५ वर्षीय मामा गंभीर जखमी झाले आहेत. ही दुर्दैवी घटना मोताळा मलकापूर रस्त्यावरील तालखेड फाट्याजवळ पाच मे रोजी दुपारी ११ ते १२ वाजाच्या दरम्यान घडल्याची माहिती आहे.

हा अपघात एवढा भयानक होता की यामध्ये तरुणाचा मेंदू बाहेर पडून त्याचा मृत्यू झाला. या तरुणाचं लग्न ठरलं असून बोहल्यावर चढण्यापूर्वीच त्याचा अशा दुर्दैवी घटनेत मृत्यू झाल्याने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

वडगाव तालुका मोताळा येथील सुरेश मुरलीधर लोखंडे वय (वर्ष ४५ वर्ष) आणि त्याचा भाचा अजय संजय कावणे (वय वर्ष २९ राहणार दाताळा) हे दोघेजण



डीलक्स मोटरसायकल क्रमांक एम एच १९ टी एस ०० ४१ या दुचाकीवरून मलकापूरकडे जात होते. दरम्यान, समोरून विटांनी भरलेला ट्रक क्रमांक एम एच १६ ए वाय ०९३० ने दुचाकीला जोरदार धडक दिली. यामध्ये मोटरसायकलवरील अजय संजय कावणे याच्या मेंदूचा अक्षरश: चुराडा झाला. त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला. मामा सुरेश मुरलीधर लोखंडे हे गंभीर जखमी झाले असून त्यांचे दोन्ही पाय फ्रॅक्चर झाले आहेत. त्यांच्यावर बुलढाणा येथे खाजगी दवाखान्यात उपचार सुरू आहे. मृत तरुणाचं नुकतंच लग्न ठरलं होतं, अशी माहिती त्याच्या नातेवाईकांनी दिली. अपघात घडल्यानंतर घटनास्थळावर नातेवाईकांनी प्रचंड आक्रोश केला. यावेळी बोराखडी पोलीस स्टेशनचे एपीआय शिंगेपल्ली, एस आय शरद खर्चे, एनपीएल प्रवीण पडोळ यांनी घटनास्थळावर जाऊन पंचनामा केला ट्रक बोराखेडी पोलीस स्टेशनला आणला असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संपादकीय



## मुलींचे यश कौतुकास्पद

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही बारावीच्या निकालात मुलींनी बाजी मारली आहे. आणि आम्ही सुद्धा मुलांपेक्षा काही कमी नाहीत हे सिद्ध करून दाखवले आहे. आणि मुलींना तुच्छ समजल्या जाणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीला जबरदस्त चपराक मारली आहे. मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या, मुलींना उच्च शिक्षण शिकू न देणाऱ्या, त्यांना घराचा उंबरठा ओलांडू न देणाऱ्या आणि मुली शिकून काय करणार आहेत? असे म्हणणाऱ्या सनातनी पालकांना मुलींनी चांगलाच धडा शिकवला आहे.

म्हणून मुलींकडे तुच्छतेने बघण्याचा पालकांचा दृष्टिकोन आतातरी बदलायला पाहिजे. असे मला वाटते.

कारण आजकाल महिला कोणत्याच क्षेत्रात मागे नाहीत.

तर पुरुषांपेक्षा दोन पावले पुढेच आहेत. आणि पुरुषप्रधान संस्कृतीला लाजवेल असे उल्लेखनीय कार्य करून भारताला जगाची महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहत आहेत. भारताचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात घेऊन जात आहेत. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची प्रेरणा घेऊन अन्यायाविरुद्ध लढा उभारत आहेत. आपल्या हक्क व अधिकारासाठी प्रशासनाला वेठीस धरत आहेत. प्रत्येक क्षेत्रात मानाचे अढळ स्थान प्राप्त करत आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही की, त्या क्षेत्रात महिलांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला नाही. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांपेक्षा अप्रतिम व अलौकिक कार्य करण्यात महिला आघाडीवर आहेत. म्हणूनच आजकाल महिलांची प्रगती पाहून सनातनी पुरुषांना त्यांच्या अलौकिक कार्याचा हेवा वाटत आहे. आणि त्यांच्या पोटात पोटशूळ उठत आहे. पण अशा सनातनी व धर्मांध मंडळींना न घाबरता महिला दिमाखाने आपले कार्य करतच आहेत. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात महिलांनी आपला एक वेगळाच दबदबा निर्माण केला आहे. आणि प्रशासनामध्ये देखील महिला पावरफुल बनून काम करत आहेत. आता राजकीय क्षेत्रात सुद्धा महिलांचा सहभाग वाढत आहे. ही खूप खूप आनंदाची बाब आहे. देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत महिला मजल मारत आहेत. सामाजिक क्षेत्रात सुद्धा महिलांचा सहभाग वाढला आहे. अतिशय उत्कृष्टपणे महिला सामाजिक कार्य करत आहेत. ही खूप खूप अभिमानास्पद बाब आहे. पण खेदाची बाब अशी की, आजकाल काही पुरुष आपल्या मुलींना उच्च शिक्षण शिकवू देत नाहीत. मुलींना दहावीपर्यंतच शिक्षण शिकवतात आणि मनपसंत स्थळ बघून तिचे लग्न लावून देतात. कारण कॉलेज जीवनात गेल्यावर मुली बिघडतात. आणि आपल्या प्रतिष्ठेला कलंकित करतात. असे काही पालकांना वाटते. म्हणून मुलींना उच्च शिक्षण शिकवायला काही पालक घाबरतात. काही काही पालकांचा तर असा गैरसमज झालेला असतो की, मुलींना उच्च शिक्षण शिकवणे म्हणजे आपली सामाजिक प्रतिष्ठा कमी करून घेणे होय. मान्य आहे की, कॉलेज जीवनात गेल्यावर काही मुली बिघडतात. कोणाच्यातरी प्रेमात पडून, शेवटी लव्ह मॅरेज करतात. शिक्षणाच्या नावाखाली नको त्या गोष्टी करतात. आणि आई-वडिलांची व घराची मान खाली घालतात. म्हणून मुलींना उच्च शिक्षण शिकवणे आई-वडिलांना नको वाटतं आहे. पण सगळ्याच मुली तशा नसतात. काही मुली ध्येयाने प्रेरित होऊन व आई-वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून खूप खूप अभ्यास करतात. नको त्या फंदात पडत नाहीत. अभ्यासाशिवाय इतरत्र वेळ घालवत नाहीत. खूप खूप उच्च शिक्षण शिकणे व आई-वडिलांचे स्वप्न साकार करणे हेच त्यांचे जीवन ध्येय बनलेले असते. अशा शीलवान व गुणवान मुलींना मनापासून सलाम करावा वाटतो. आणि शिक्षणाच्या नावाखाली प्रेमाचा बाजार मांडणाऱ्या मुलींना एवढेच सांगावे वाटते की, मुलींनो क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंनी सनातनी व धर्मांध लोकांना विरोध करून तुमच्यासाठी शिक्षणाची दारे खुले करून दिली. म्हणून आपणही प्रेमाच्या फंदात न पडता, आई-वडिलांना बेईमान न होता, सावित्रीमाई फुलें, माता रमाई, किरण बेदी व प्रतिभाताई पाटील या कर्तृत्वान महिलांचा आदर्श घेऊन उच्च शिक्षणाचा पर्वत लीलया सर करावा... आणि समस्त पालकांना माझी विनंती आहे की, आपल्या मुलींना पहिल्यांदा सुसंस्कारी बनवा... त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून द्या.. त्यांना यशस्वी व आदर्श महिलांच्या यशोगाथा सांगा... सावित्रीबाई फुले व सिंधुताई सपकाळ या महामातांचा जीवन संघर्ष त्यांना ज्ञात करून द्या... म्हणजे त्या प्रेमाच्या भानगडीत पडणार नाहीत... फक्त अभ्यास आणि अभ्यासच करतील... आणि आपले व आपल्या गावकऱ्यांचे नाव उंचावतील... असे मला वाटते. कारण सावित्रीमाई फुलेंच्या लेकीत खूप टॅलेंट व प्रत्येक क्षेत्र हाताळण्याचा जबरदस्त हातखंडा आहे...म्हणूनच आजकाल प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांपेक्षा उल्लेखनीय काम करत आहेत. दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून मुलांपेक्षा पुढे जात आहेत. म्हणूनच सावित्रीमाईंच्या मुलींच्या यशाचे कौतुक होणे, ही काळाची गरज आहे.

# मानवी वर्तन- न सुटणारे कोडे

तू असं का वागतो?, तुझे सर्व निर्णय का फसतात ?, तुला काही डोकं आहे की नाही?, तुझ्या मनात नेमकं काय चाललेलं असतं? – असे अनेक प्रश्न आपण एखाद्या अविचारी व्यक्तीला विचारून त्याला भंडावून सोडतो. सतत चुका करणाऱ्याला आपण कधी कठोर बोलून, तर कधी गोडीगुलाबीने समजावून सांगतो, त्याला वाईट वर्तनापासून परावृत्त करण्याचा मनापासून प्रयत्न करतो.

सतत व्यसन करणारे,भांडण-हाणामारी करणारे, अभ्यास न करणारे विद्यार्थी, असभ्य वर्तन करणारे, फसवणूक करणारे, चंगळवादी वृत्ती असणारे, उद्धट, उन्मत्त आणि बेजबाबदारपणे वागणे अशा दूरवर्तन करणाऱ्या व्यक्तींना समजावून सांगणे हे खरेच एक दिव्य कार्य आहे.

मानवी वर्तनात बदल घडवण्यासाठी नेमकं काय केलं पाहिजे, याचे ठोस तंत्र अद्याप विकसित झालेले नाही. माणसाच्या मेंदूची रचना, त्यामधील रसायनांचे स्राव, यांचा अभ्यास करून थोड्याशा यशस्वी पद्धती विकसित झाल्या आहेत. मात्र, जसा एखादा आजार मुळासकट बरा करता येतो, तसा



वर्तनात बदल घडवण्यासाठी त्या व्यक्तीचा शंभर टक्के सहभाग गरजेचा असतो. दूरवर्तन करणारी व्यक्ती बहुतेक वेळा स्वतःला चुकीचे समजत नाही. काही वेळा त्यांना आपली चूक ठाऊक असते, पण ते मुद्दाम वाईट वर्तन करतात. अशा व्यक्ती ऋळऑीं-ॅवशऑ ींहळपज्ञळपस म्हणजेच तात्काळ परिणाम न पाहता फक्त क्षणिक सुख, चैनी, क्रूर भावना, कपट, हिंसा यांवर आधारित निर्णय घेतात.याउलट, डशलेपव-ॅवशऑ ींहळपज्ञळपस करणाऱ्या व्यक्ती विचारपूर्वक निर्णय घेतात. अशा व्यक्तींच्या वर्तनाचा काहीसा अंदाज बांधणे शक्य असते. मानसशास्त्रात 'वर्तनवाद' (इशहर्रींळेऑळीा) ही संकल्पना जॉन वॉटसन यांनी मांडली. त्यांच्या मते मन हा मानसशास्त्राचा अभ्यासाचा विषय नाही, तर वर्तन अभ्यासाचा मुख्य विषय आहे. कारण मन दिसत नाही, पण वर्तन हे दृष्टिगोचर असते. परिसर आणि संस्कार वर्तनावर मोठा प्रभाव टाकतात.वॉटसन म्हणतात, मला डझनभर निरोगी मुले द्या. मी त्यांना विशिष्ट पद्धतीने वाढवेन आणि त्यांच्यातील एकाला डॉक्टर, दुसऱ्याला वकील, तिसऱ्याला कलाकार, तर एखाद्याला भिकारी किंवा चोर सुद्धा बनवू शकेन. यामध्ये त्यांनी अनुवंशिकतेपेक्षा घडवणुकीचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

बी.एफ. स्किनर या मानसशास्त्रज्ञाने वर्तनवादावर सखोल अभ्यास केला. त्याच्या मते, ज्या वर्तनाचे अनुकूल परिणाम दिसतात, त्याची पुनरावृत्ती होते, आणि ज्याचे प्रतिकूल परिणाम असतात, ते वर्तन टाळले जाते.

उदाहरणार्थ, अस्वच्छ परिसरामुळे रोगराई वाढते हे लक्षात आल्यानंतर लोक परिसर स्वच्छ ठेवतात. वृक्षतोडामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत असल्याने वृक्षारोपण व संवर्धनाकडे कल वाढतो.

अर्थात, कोणाच्या वर्तनावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. स्वतःचे वर्तन स्वतःलाच तपासून, त्यामध्ये बदल घडवावा लागतो, हे मात्र नक्की.


आज सोशल मीडियाचा प्रभाव समाजात फार मोठ्या प्रमाणात होत आहे. उजव्या विचारसरणीच्या व्यक्तीला डाव्या विचाराचा किंवा एखाद्या डाव्या विचाराच्या व्यक्तीला उजव्या विचारसरणीचा करण्याची ताकद सोशल मीडियामध्ये आहे. अर्थात एखाद्या मध्ये पूर्ण वर्तन बदल करण्याची क्षमता सोशल मीडियामध्ये आज आली आहे. तंत्रज्ञानाचा कौशल्याने वापर करून आणि सोबत 'गोबेल्स तंत्र ' वापरून ब्रेन वॉश केले जात आहे. यासाठी शाळा कॉलेज यामधून तज्ञ लोकांनी, शिक्षकांनी आणि प्राध्यापकांनी योग्य संस्कार देऊन तरुण आणि विद्यार्थ्यांच्या वर्तनावर होणारे आक्रमण थोपवले पाहिजे.

शेवटी मानवी वर्तन हे एक न सुटणारे कोडे जरी असले तरी यावरती अभ्यास आणि संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

# भगंदर, मूळव्याध व फिशर या सारखे आजार होण्याचे कारण काय असू शकते ?

दैनंदिन जिवनात आपण जेवणात तसेच दिवसभरच्या खाण्यात-पिण्यात कशाचे सेवन करतो याचबरोबर आपण कोणते शारीरिक श्रम करतो यावर आपली पचनक्रिया आधारित असते. तुम्हाला मूळव्याध व भगंदर यासारखे आजार होउ नये, त्यासाठी कोणत्या गोष्टीची काळजी घ्यावी,ते आपण सदर लेखात बघणार आहोत! सगळ्या महत्त्वाचं म्हणजे सकाळी उशीरा पर्यंत झोपणे टाळावे तत्यामुळे तुमची पचनशक्ती बिघडते, सकाळी नाश्तामधे बटाटे, बेसन, तेलाचे पदार्थ, शिळे अन्न, मैदा, साखर, साबुदाणा अशा प्रकाचे पचायला जड पदार्थ खाऊ नये. खूप वेळ पर्यंत बसून राहण्याचे शारीरिक श्रम असणारा जर तुमचा व्यवसाय असेल तर




मूळव्याध आणि भगंदर होण्याचे शक्यता अशा लोकांना मध्ये जास्त असते. तसेच अनुवंशिक हा आजार असल्यामुळे जर आपल्या परिवारात कोणाला हा आजार असला तर पुढल्या पिढी मध्ये येण्याची शक्यता जास्त असते. अशा वेळेस आपण या पासून कसे दूर राहावे आणि आजार झाल्यास त्याची गंभीरता वाढू नये याची काळजी घ्यावी. त्या साठी आपण आयुर्वेदिक पद्धतींना स्वीकारून स्वतःचा बचाव करू शकतो. रोजच्या जे-वणात सलाद, हिरवे भाजीपाला, काकडी, गाजर, गोभी अशा गोष्टींचा समावेश करावा, सोबतच ताक, दूध केळी रोज खाल्ले तर ऊत्तम राहील. सतत एकच जागी बसून काम असेल तर दर २ तास नि ब्रेक घ्यावा, रात्री जागरण, स्ट्रेस, मानसिक तणाव, या सगळ्या गोष्टी ही हा आजार होण्याला कारणीभूत आहेत. एखाद्या आजाराचे खूप वेळ पर्यंत औषधी चालू असणे हे भगंदर आणि मूळव्याध होण्याचे दुसरे कारण राहू शकते.

गर्भवती असताना प्रसूती दरम्यान जास्त तणाव पडल्याने मूळव्याध, फिशर होऊ शकतो. मानसिक तणावा मुळे भूक न लागणे, वेळेवर न खाणे यांमुळे तुमची पचनक्रिया भंग होते आणि तुम्ही या आजाराला बळी पडता. म्हणून तुमची दैनंदिनी ही खूप महत्वाची आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास हा आजार गंभीर होऊ शकतो ज्या मधे फक्त शस्त्रक्रिया करणे हाच एक उपाय आहे. जास्त रक्तस्राव झाल्याने इतर आजार ही होऊ शकते. म्हणून आपण जर या छोट्या गोष्टीची काळजी घेत असेल तर तुम्ही शस्त्रक्रिया पासून आणि आजारापासून स्वतःची सुरक्षा करू शकता.

**डॉ. तेजश्री वामनराव बनसोड**
**(एम. एस. शल्यतंत्र)**
**फोन - ७४९८५ १३२५२**

## मॉक ड्रिलने..

डिफेन्स मॉक ड्रिलने
सावरे जन मनस्थिती
शिकवेसामान्यलोका
हाताळे संकट स्थिती

कधीकरे ब्लॅक आउट
हवी अचूकते माहिती
सायरनसूचना कळता
कशी असावी पध्दती

सिमेवर सैनिकलढती
हवे देशांतर्गत सोबती
युध्द सर्वपातळीवरती
सुजाण सतर्क शोभती

सु सज्ज आहो संपूर्ण
जगा दिसो महाशक्ती
सहभाग सक्रिय द्यावा
महत्वाची हरेकव्यक्ती

घडीखरोखर परिक्षेची
आताचंकळे देशभक्ती
विविधता भले विचारा
भारतमाता मन तख्ती

सळाळो चिंताविरहित
रे भय मुक्त उर्जा रक्ती
नागरिकां वेळ आली
कर्तव्याची हो जागृती

स्वार्था पल्याड विचार
विश्वा दिसावीसंस्कृती
जबाबदारी सांभाळता
पराजित करी विकृति


**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# दोन राष्ट्रगीतांचे जनक ; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ मे, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्दूल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने सर ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# वाचक पत्र



## 'कॅट' चा निर्णय स्वागतार्ह !

कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स( कॅट) या भारतातील व्यापाऱ्यांच्या एका प्रमुख संघटनेने पाकिस्तान सोबत व्यापार बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. देशभरातील ४०,००० पेक्षा अधिक व्यापारी संघटना आणि त्यांचे ९ कोटीहून अधिक सदस्य व्यापारी यांचे प्रतिनिधित्व करणारी कॅट ही अग्रगण्य संघटना आहे. त्यांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा निषेध व पाकिस्तान ला धडा शिकविण्याच्या उद्देशाने घेतलेला हा निर्णय स्तुत्य आहे.

दहशतवादास खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तान ला सीमेवर उत्तर दिले जाईलच मात्र त्यासोबतच जनतेने त्यांच्या आर्थिक मुसक्या आवळणे हे देशांतर्गत प्रतिकाराचे नक्कीच प्रभावी पाऊल ठरेल, जेणेकरून कंगाल झालेला पाकिस्तान यापुढे भारतावर कोणताही हल्ला करण्याचा विचारही करणार नाही.

कॅट प्रमाणेच इतर क्षेत्रातही याचा विचार व्हायला हवा. सोबतच प्रत्येक नागरिकाने स्वतःचे वर्तमान सुरक्षित करण्यासाठी कट्टरपंथीयांसोबत चे सर्व आर्थिक व्यवहार बंद करणेच देशाच्याही सुरक्षेसाठी महत्वाचे पाऊल ठरेल. आतंकवादाला धर्म नसतो असे म्हणून क्रूर आतंकवादी आक्रमणाची पाठराखण करणाऱ्यांना खरेतर पोटातील भुकेला धर्म नसतो हे सत्य अनुभवायची वेळ आता आली आहे.

**- सौ.स्वाती हरेर, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

